जोडीदाराशी नाते कसे टिकवाल?

पान ३ वरून

भांडणाचा मूळ मुद्दा बाजूला राहतो आणि जुन्या कोणत्या तरी मुद्द्यावर नवे भांडण सुरू होते. त्यामुळे जुन्या गोष्टी उकरून न काढता या क्षणी होणाऱ्या भांडणाचे कारण काय ते शोधा. ते कसे मिटवता येईल याकडे लक्ष द्या. कितीही मोठे भांडण झाले तरी समोरच्या व्यक्तीला बोलायची संधी द्या आणि तुम्ही ते ऐकून घ्या. आपण बऱ्याचदा समजून घेण्यासाठी न ऐकता प्रत्युत्तर देण्यासाठी ऐकतो. समस्या सोडवण्यापेक्षा समोरच्याला हरवून आपण या वादात कसे जिंकू शकू याकडे लक्ष देतो. त्यामुळे नात्यात दुरावा निर्माण होतो. भांडणानंतर जोडीदारासोबत अनेक दिवस अबोला धरला जातो आणि हा दुरावा अधिक वाढतो. हे दोघांसाठीही चांगले नाही. त्यामुळे ज्या दिवशी भांडण होईल त्याच दिवशी ते मिटवा. भांडण तसेच ठेवून एकमेकांशी अबोला धरून दिवसाचा शेवट करू नका. त्याऐवजी एकमेकांशी बोलून, त्यावर तोडगा काढून, भांडण मिटवून शांत चित्ताने झोपी जा. चूक ही प्रत्येकाकडून होते त्यामुळे माफ करायला शिका.

प्रश्न : या कौटुंबिक वादाचे परिणाम मुलांवर काय होतात?

उत्तर: घरातील सततच्या भांडणांचा परिणाम हा त्या नात्यावर जितका होतो त्यापेक्षा कैक पटीने जास्त वाईट परिणाम त्या घरातील मुलांवर होत असतो. मुलांनी लहानपणापासून आपल्या आई वडिलांना सतत एकमेकांशी भांडताना, एकमेकांवर ओरडताना पाहिले असेल तर त्या मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर याचा परिणाम होतो. कौटुंबिक वादामुळे मुलांमध्ये भावनिक गोंधळ निर्माण होतो, त्यांना स्वत:बद्दल आत्मविश्वास वाटत नाही, स्वत:च्या आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेण्याबाबत ती द्विधा मनस्थितीत आणि घाबरलेली असतात. काही मुलांमध्ये भांडखोर वृत्ती निर्माण होते.

प्रश्न : नात्यात विश्वास वाढवण्यासाठी काय करावे?

उत्तर: कोणत्याही नात्यामधील विश्वास वाढवण्यासाठी त्या दोन व्यक्तींमध्ये संवाद असणे फार महत्त्वाचे आहे. धकाधकीच्या जीवनात, कामांच्या व्यापात आपण इतके अडकतो की एकमेकांना पुरेसा वेळ देऊ शकत नाही. बऱ्याचदा कामचा ताण असतो, घरी आल्यावर प्रचंड थकलेलो असतो या सगळ्या गोष्टींमुळे एकमेकांशी बोलायला वेळ मिळत नाही. पण नात्यामध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी एकमेकांना वेळ देणे, एकमेकांशी मोकळेपणाने बोलणे गरजेचे आहे. आपल्या जोडीदारासाठी दिवसभरातील थोडासा वेळ तरी काढाच. त्या वेळेत दिवसभरात तुमच्यासोबत काय घडले ते सांगा, जोडीदारासोबत काय घडले ते ऐकून घ्या. त्यामुळे नाते दृढ होण्यास मदत होते. एखादा मोठा खर्च असो किंवा गुंतवणूक, नोकरी बदलायचा विचार असो किंवा नवी वस्तू खरेदीचा निर्णय घेणे असो या सगळ्याच बाबातीत आपल्या जोडीदाराला विश्वासात घ्या. त्याचे मत तुमच्यासाठी महत्त्वाचे आहे याची जाणीव त्याला होऊ द्या. त्यामुळे तुमच्या जोडीदाराच्या मनातही नात्याबद्दल विश्वास निर्माण होतो. नात्यात विश्वास असला की ते नाते आयुष्यभर टिकते.

प्रश्न : आपल्या जोडीदाराचा भूतकाळ जाणून घेण्याचा हट्ट योग्य आहे का? आपला भूतकाळ जोडीदाराला सांगावा का?

उत्तर : ही गोष्ट जोडीदार किती समजूतदार आहे त्यावर अवलंबून असते. त्याचा अंदाज घेऊन या गोष्टींचा खुलासा करावा. शिवाय खूप तपशील सांगत बसू नये. आम्ही इथे फिरायला जायचो, तिथे खायला जायचो वगैरे सांगणे टाळा. कारण ही अधिकची माहिती अनेकदा समोरच्या व्यक्तीच्या मनात बराच काळ रेंगाळत राहाते. त्यातून भांडणे होऊ शकतात. तुम्ही जोडीदारापासून तुमचा भूतकाळ लपवून ठेवू नका किंवा त्याविषयी काही विचारले गेले तर खोटेही बोलू नका. पण जितके थोडक्यात सांगता येईल आणि जितके गरजेचे असेल तितकेच सांगा.

प्रश्न : भूतकाळातील जोडीदार आणि वर्तमानकाळातील जोडीदार यांच्यात सतत तुलना केल्याने काय होऊ शकते?

उत्तर: प्रत्येक व्यक्ती सारखी नसते त्यामुळे कोणत्याच दोन व्यक्तींचे नाते देखील सारखे असू शकत नाही हे लक्षात घ्या. तुम्ही सतत तुमच्या भूतकाळातील जोडीदाराची तुलना वर्तमानकाळातील जोडीदाराशी करत राहिलात तर तुमच्या जोडीदाराला तुमच्यावर विश्वास ठेवणे कठीण होते. तुलना करत राहिल्याने तुम्ही नव्या नात्याचा स्वीकार पूर्णपणे करू शकणार नाही आणि नेहमीच नाखुष राहाल. आधीच्या नात्यातील व्यक्तीसोबतही तुमचे मतभेद व्हायचे, त्या नात्यामध्येही उणिवा होत्याच म्हणून तुम्ही त्या जोडीदाराला सोडण्याचा निर्णय घेतला हे समजून घ्या. तुमचे नवीन नाते हे उत्तमच आहे हा विश्वास मनात ठेवा.

प्रश्न : जोडीदार सोडून गेल्यावर त्यामुळे होणाऱ्या त्रासातून बाहेर पडण्यासाठी काय करावे?

उत्तर: नाते म्हटले की भावनिक गुंतवणूक आली आणि ते नाते तुटल्यावर, जोडीदार सोडून गेल्यावर त्रास हा प्रत्येकाला होतो. पण या त्रासातून सुटका करून घेण्यासाठी सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वत:ला पुरेसा वेळ द्या. शेवटी वेळ हेच यावरचे सर्वोत्तम औषध आहे. तुम्हाला आवडणाऱ्या गोष्टींमध्ये मन रमवा. जुन्या मित्र-मित्रणींना भेटा, कुटुंबासोबत फिरायला जा, कामामध्ये स्वत:ला गुंतवून घ्या. जवळच्या व्यक्तींकडे मन मोकळे करा. त्याने तुम्हाला फायदा होईल. भावनांचा निचरा करण्यासाठी तुम्ही डायरीदेखील लिहू शकता. त्या डायरीत तुमच्या मनात येणारे सगळे विचार, भावना, दु:ख लिहून काढा. या त्रासातून बाहेर पडण्यासाठी आजची तरुणाई सिगरेट, दारूच्या आहारी जाताना दिसते. स्वत:ला या वाईट सवयी लावून घेऊ नका. हे सगळे उपाय क्षणिक आनंद देतात पण मूळ समस्येचे समाधान त्याने होत नाही.

प्रश्न : समाजाच्या दबावामुळे मनात नसताना लग्नाला होकार दिला जातो नंतर दोघेही आनंदी नसतात अशावेळी काय करावे?

उत्तर: आई-वडिलांना दुखवायचे नाही असा विचार करून दुर्देवाने अनेक जण एखाद्यावर प्रेम जडलेले असताना दुसऱ्याच व्यक्तीला होकार देऊन लग्न करतात.

या निर्णयामुळे ते स्वत:वर आणि ज्या व्यक्तीशी लग्न करत आहेत त्या व्यक्तीवरही अन्याय करत असतात. त्यापेक्षा आधीच शक्य असल्यास स्वत:च्या निर्णयावर ठाम राहा. स्वत:च्या आयुष्याचा कंट्रोल स्वत:कडे ठेवा. असे करणे शक्य नसल्यास नव्या नात्याचा स्वीकार कोणालाही दोष न देता करा. तुमचे त्या व्यक्तीवर प्रेम नसेल पण एकत्र राहून अनेकदा प्रेम निर्माण होऊ शकते. प्रेम एकदाच होते या म्हणण्याला काही अर्थ नाही.

जाहिर नोटीस

क्षात्रकुलोत्पन्न मराठा समाज, मुंबई

वार्षिक सर्वसाधारण सभा

अधिसूचना

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ०६/०३/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता डॉ. शिरोडकर स्मारक मंदिर येथे क्षा. म. समाजाचे अध्यक्ष श्री. अनिल शंकर खाजणवाडकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी अवश्य उपस्थित राहावे, अशी नम्र विनंती आहे.

स्थळ :- डॉ. शिरोडकर
स्मारक मंदिर, १४२/१४९,
डॉ. बोर्जेस मार्ग, परेल,
मुंबई - ४०००१२.
दिनांक : १४/०२/२०२१

आपले नम्र
श्री. श्रीकृष्ण दाजी हंजनकर (सरचिटणीस)
श्री. सुरवा बाबाजी मुंबरकर (सहचिटणीस)
श्री. अनिल तुकाराम कोठारकर (उपचिटणीस)

सभेपुढील कामकाज

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतान्त मंजुर करणे.
२) २०१९-२०२० सालचा वार्षिक अहवाल मंजुर करणे.
३) २०१९-२०२० सालचा जमा खर्च मंजुर करणे.
४) २०२०-२०२१ सालची अंदाजपत्रके मंजुर करणे.
५) २०२०-२०२१ सालकरिता वैधानिक लेखा परिक्षकांची निवड करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६) २०२०-२०२१ सालकरिता ४ अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड करणे.
७) अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर कामे.

-:सूचना:-

१. ज्या सभासदांना अहवाल व जमाखर्च या संबंधी प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी ते दिनांक २६/२/२०२१ पर्यंत सायंकाळी ६ ते ८ या वेळेत लेखी पाठवावेत. अहवाल व जमाखर्च या विषयाचे प्रश्न एका ठिकाणी न लिहिता वेगवेगळे लिहून पाठवावेत. प्रश्नांच्या बाबतीत प्रश्नकर्त्यांने कार्यालयाशी सभेपूर्वी ३ दिवस अगोदर संपर्क साधावा. त्यांची उत्तरे कार्यालयात दिली जातील.

२. ४ अंतर्गत हिशेब तपासनीस या जागांसाठी ज्यांना उभे रहावयाचे असेल अशांनी सूचक, अनुमोदक व किमान ५० सभासदांची नावे, त्यांच्या सह्यानिशी समाजाच्या कार्यालयात दिनांक २६/२/२०२१ पर्यंत सायंकाळी ६ ते ८ या वेळेत आणून द्यावेत

तुमचे नी आमचे सेम नसते...

पान ३ वरून

तो अतिरथी होता आणि युद्धात इतर पुरुष योद्ध्यांच्या बरोबरीने पराक्रम गाजवत होता.

महाभारत ही ज्या चांद्रवंशीय राजांची कथा आहे. त्या चांद्रवंशाची सुरुवात ही अशीच विचित्र झालेली आढळते. एक पुरुष जो शापित होऊन स्त्री झाला त्याला झालेल्या मुलाने चांद्रवंशाची सुरुवात केली. वैवस्त मनुचा मोठा मुलगा सुद्युम्न किंवा राजकुमार इल एकदा शिकारीला गेला असताना पार्वतीने जादूने बांधलेल्या शरवनात प्रवेश करतो. या वनात केवळ स्त्रिया किंवा प्राण्या-पक्षांच्या माद्यांनाच येण्यास परवानगी होती. आपला एकांत कुणा पुरुषाने पहावा हे पार्वतीला वाटत नसे. या जादूई वनात चुकून प्रवेश झालेल्या राजकुमार इलचे रूपांतर स्त्रीमध्ये होते. इलची इला होते. त्याच्यासोबत असलेले सगळे सैन्य किंपुरूष बनते. पुढे ही इला बुधाला भेटते आणि त्याच्या प्रेमात पडते. विशेष म्हणजे हा बुध स्त्री आणि पुरूष दोन्ही नाही. एक वक्ती जी स्त्री आणि पुरूष दोन्ही आहे ती अशा व्यक्तीच्या प्रेमात पडते जी स्त्री किंवा पुरूष यापैकी कोणीही नाही. त्यानंतर इलाला १५ दिवस स्त्री आणि १५ दिवस पुरूष होऊन जगण्याचा उ:शाप मिळतो... इला आणि बुधातील प्रेम मात्र कायम राहते. त्यामुळे ज्या पंधरवड्यात तो इल असतो त्यावेळी बुधाजवळ बसून शास्त्राचे शिक्षण घेतो आणि जेव्हा १५ दिवसांनी इलची इला होते त्यावेळी ती पतीसेवेत रमणारी स्त्री बनते. इलाची मूळ कथा ऋग्वेदात पहिल्यांदा येते, मग ती महाभारतात आपल्याला अजून विस्ताराने भेटते, रामायणात ही कथा अश्वमेध यज्ञाच्या महतीसाठी येते, देवी भागवतात इला देवीरूपात विलीन होऊन तिला मोक्ष मिळतो. बुधाची कथा इलाच्या कथेच्या सोबतीने येते, बुध ही भारतीयांची बुद्धीची देवता, गणेशाच्याही आधीची, हा बुध स्त्री किंवा पुरुष दोन्ही नाही हे विशेष.

महाभारतातच एकदा नव्हे तर दोनदा युवनाश्व राजाची कथा येते. या राजाला दिवस जातात आणि पुढे याला मूल होते जे मांधाता या नावाने ओळखले जाते. मांधाता राजाचा राज्यकाळ हा सुवर्णयुग समजला जातो.

पुराणात तर लिंग बदलाचा उत्सव मांडण्यात आलेला आहे. स्कंद पुराणात सुमेध आणि सोमवान नावाच्या दोन जिगरी मित्रांची कथा आहे. ज्यात सोमवान सोमवती बनून सुमेधसोबत राजाच्या दरबारी जेवायला जातो. पुढे तो स्त्री नसून पुरुष आहे हे उघड होते, सुमेध आणि सोमवान दोघांना तुरुंगात टाकण्यात येते. पण एका रात्रीत सोमवान पुरुषाची स्त्री होतो, आणि दुसऱ्या दिवशी आपले स्त्रीत्व सिद्ध करत आपल्या मित्र-नवऱ्याचा जीव वाचवतो. या कथेत पुरुषत्व सिद्ध करावे लागत नाही पण स्त्रीत्व सिद्ध करावे लागत आहे.

पद्म पुराणात अर्जुनाची अर्जुनी होण्याची कथा येते. कृष्णासोबत गोपी कशा रात्री घालवतात हे जाणून घेण्याची इच्छा अर्जुनाला होते, आणि तो कृष्णाकडे तशी याचना करतो. तेव्हा एका रात्रीसाठी कृष्णाच्या आशीर्वादाने अर्जुन आपले पुरुष रूप टाकून स्त्री होतो. त्याची अर्जुनी होते, अर्जुनी शृंगार करते, आपले ओठ पानाने रंगवते. कृष्णाशी एकरूप होते. दुसऱ्या दिवशी सकाळी अर्जुनीचा पुन्हा अर्जुन होतो. पण काल रात्रीचा अनुभव त्याच्या मनात तसाच ताजा असतो.

गांजा पिणारा, राख लाऊन स्मशानात रमणारा, आपली तपस्या भंग केली म्हणून तिसरा डोळा उघडून मदनाची राख करणारा शिव अर्धनारीश्वर होतो, इतकेच काय कृष्णाच्या रास लीलेचा भाग होण्यासाठी शरद पौर्णिमेला गोपी बनून जातो. आजही स्त्रीरूपातल्या शिवाची-गोपेश्वराची पूजा वृंदावनात होते. बुधाचे वाहन असलेला व्याली हा अर्धा हत्ती, अर्धा वाघ आहे, कामदेवाचे वाहन असलेला मकर हा अर्धा मासा अर्धा हत्ती आहे, उडिया महाभारतात अर्जुनाशी सामना करणारा नवकुंजर नऊ वेगवेगळ्या प्राण्यांचे मिश्रण आहे. मकरावर स्वार असलेला कामदेव आपल्या बाणांनी सगळ्यांनाच घायाळ करत असतो. भगवान विष्णूचा मोहिनी अवतार तर आपल्या सगळ्यांच्या परिचयाचा आहे. पण आज आपण आपल्या आजूबाजूला काय बघतो आहोत? विभिन्न लैंगिकतेचे दमन करणारी व्यवस्था आपण जन्माला आणतो आहोत. आपल्याला एका स्त्री आणि पुरुषातले प्रेम असह्य होते मग तिथे कधी धर्म आडवा येतो, कधी जात, कधी प्रांत, कधी भाषा. पण प्रेम हे उंचावरून अनिर्बंध पडणाऱ्या... वेगाने रोरावत समुद्राला भेटायला निघालेल्या गंगेसारखे असते. त्यात स्वत:चा एक आवेग असतो, मधे येणाऱ्या बाधांना तोडत जशी गंगा समुद्राला मिळते तसेच अनेक अडचणी पार करत दोन प्रेमी जीव एकत्र येतात, त्यामुळे अशा प्रेमाला अडवण्याऐवजी त्याला मोकळी वाट करून देणे हेच माणूसपणाचे लक्षण आहे... नाही का?

(लेखकाचे आतापर्यंत यह तेढी मेरी यारी, ईला, वेद आणि रामायण सीजन १ हे ऑडीओबुक्स स्टोरीटेलवर प्रकाशित झालेत.)

पश्चिम रेल्वे

पार्किंग कंत्राट

विभागीय रेल्वे व्यवस्थापक, वाणिज्यिक विभाग, पार्किंग सेक्शन, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४००००८. **कामाचे नाव :** मुंबई विभागावर " ऑल व्हेईकल पे अँण्ड पार्क " चालविणे. **१. ई - निविदा सूचना क्र. :** C481 - T20 - MDD - E - 31 Dated : 12.02.2021 **स्थळ :** मालाड (पूर्व) **क्षेत्रफळ चौ. मी. मध्ये :** ३६०.०० ०३ **वर्षांसाठी कामाचे अंदाजित मूल्य :** ₹ १२,५२,९०५ **इरठे :** ₹ ६२,७०० **२. ई - निविदा सूचना क्र. :** C481 - T20 - ST - E - 32 **Dated :** 12.02.2021 **स्थळ :** सुरत (पूर्व) **क्षेत्रफळ चौ. मी. मध्ये :** १२८३.१९ ०३ **वर्षांसाठी कामाचे अंदाजित मूल्य :** ₹ १,२३,०६,६१५ **इरठे :** ₹ ६,१५,४०० **सादर करण्याची तारीख व वेळ :** १२.०२.२०२१ रोजी १०.०० वा. - १२.०३.२०२१ रोजी १५.०० वा. पर्यंत. **उघडण्याची तारीख व वेळ :** १२.०३.२०२१ रोजी १५.३० वाजता. अधिक तपशिलासाठी कृपया पश्चिम रेल्वेच्या सार्वजनिक संकेतस्थळ **www.ireps.gov.in** वर भेट द्या. **659**

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

ई-प्रोक्युअरमेन्ट निविदा सूचना

क्र. एस/०६/२०२१ दिनांक १०.०२.२०२१

अ.क्र.	बाबींचे संक्षिप्त वर्णन	परिमाण	टी.ओ.डी.
१११	इक्विपड हॉपर असेंब्ली	१७६ जोड्या	२६.०२.२०२१
११२	कॅटेनरी एन्डींग क्लॅम्प (६५)	१६५२ संच	०१.०३.२०२१
११३	स्टेनलेस स्टील वायर रोप	१४६६ नग	०१.०३.२०२१
११४	फायबर फिल्टरसाठी मायक्रो फिल्टर एलिमेंट	८९ नग	०२.०३.२०२१
११५	इन्स्ट्रुमेन्ट कूलिंग फॅन	२८९ नग	०२.०३.२०२१
११६	फ्लेक्झीबल पॉली व्हिनायल क्लोराईड (पीव्हीसी) फ्लोरिंग शिट	१२० नग	०३.०३.२०२१
११७	एम.सी.कन्ट्रोलर	९ नग	०३.०३.२०२१
११८	कॅपॅसिटर	३४२६ नग	०३.०३.२०२१
११९	आरसी डॅम्पिंग नेटवर्ककरिता कॅपॅसिटर	४३७ नग	०३.०३.२०२१
१२०	कन्व्हर्टर ऑईल पम्पकरिता सर्किट ब्रेकर	११ नग	०३.०३.२०२१
१२१	स्लायडींग डोअर	२० नग	०३.०३.२०२१
१२२	पिस्टन हेड हिस्सा	८०० नग	०४.०३.२०२१
१२३	कॅटेनरी वायर स्प्लाईस (६५ एमएम)	१२७१ संच	०५.०३.२०२१
१२४	[illegible]	४१ नग	०५.०३.२०२१
१२५	व्हर्टिकल डॅम्पर कॅपॅसिटी ४०० किलो	३०४ नग	०५.०३.२०२१
१२६	एमआरव्हीसी-II ईएमयू रेक करिता एमएमअवय कॅब कन्ट्रोल पॅनल	११ नग	०५.०३.२०२१
१२७	कायमस्वरूपी फिल्ड हायड्रंट	१५ नग	०५.०३.२०२१
१२८	लॅबिरिन्थ आणि बिअरिंग कॅप आणि क्लॅम्प प्लेट (टीई)चा संच	१५६ संच	०६.०३.२०२१
१२९	एसएससीटीएसीचा पुरवठा	३२ संच	०८.०३.२०२१
१३०	रूफ माउंटेड व्हेंटिलेशन युनिटचा पुरवठा	४४ संच	०८.०३.२०२१
१३१	रोलर बिअरिंग डब्ल्यूएपी १३०×२४० पीई	१२८ संच	०८.०३.२०२१
१३२	डब्ल्यूएपी-५ करिता एक्सल बॉक्स बिअरिंग (टॅपर्ड रोलर बिअरिंग)	२० नग	०८.०३.२०२१
१३३	बायो-प्रसाधनगृहाकरिता स्टेनलेस स्टील कचरा पेटी	२५०० नग	०९.०३.२०२१
१३४	सर्किट ब्रेकर डीसी पुरवठा	१२ नग	०९.०३.२०२१
१३५	जंपर हुक ४० एमएम	५८ नग	१०.०३.२०२१
१३६	जंपर हुक ४८ एमएम	२५ नग	१०.०३.२०२१
१३७	एफ.एस. ऑल स्टील लॉकनट साईज एम२४ फॉर डब्ल्यूएपी७	६५५२ नग	१०.०३.२०२१
१३८	आर/एम रंग सोनेरी पिवळा	२२६४० लीटर	११.०३.२०२१
१३९	बोल्स्टर लायनर आकार १५३ एमएम × १२० एमएम × ८ एमएम जाड	११७३४ नग	११.०३.२०२१

तपशीलवार सूचनेशी संदर्भित ईएमडी, खरेदी निर्बंध आणि निविदेच्या तपशीलवार शर्तींकरिता कृपया वेबसाईट www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in येथे भेट द्या.

प्रमुख मुख्य सामग्री व्यवस्थापक करिता

655

Like us on : facebook.com/WesternRly | Follow us on : twitter.com/WesternRly

---

जाहीर सूचना

याद्वारे तमाम जनतेस सूचित करण्यात येत आहे की, श्रीमती सावित्री बाबुराव गुरव बिल्डींग नं.१, सदनिका क्र.ए-३०६, तिसरा माळा, ओम शिवाई एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, देवीपाडा, बोरीवली (पूर्व), मुंबई- ४०० ०६६, यांचे दिनांक ०७-०५-२०१३ रोजी निधन झाले असून त्यांनी त्यांच्या हयातीत नामनिर्देशन केलेले नाही. तसेच मृत व्यक्तीचा मुलगा श्री. जयंत बाबुराव गुरव यांनी केलेल्या दाव्यानुसार/ अर्जानुसार वरील सदनिकेचा संपूर्ण मालकी अधिकार त्यांच्या नावे हस्तांतरीत करण्यात यावे. संस्था ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळवीत आहे की, वरील सदनिका हक्कदार/वारसदार श्री. जयंत बाबुराव गुरव ऐवजी जे कोणी बिल्डींग नं.१-अे, सदनिका क्र.३०६, च्या हक्काचा दावा ही नोटीस जाहिर झाल्याच्या १५ दिवसांत आपला दावा/आक्षेप वरील संस्थेचे पदाधिकारी ह्यांच्या समक्ष लेखी व सर्व पुराव्यासोबत सादर करावे. जर दिलेल्या कालावधीत कोणताही दावा/आक्षेप प्राप्त झाला नाही तर संस्था सदर सदनिकेचा मालकी हक्क कायद्याप्रमाणे घेण्यास स्वतंत्र असेल. जर कोणालाही वरील नमूद सदनिकेबद्दल कोणताही दावा/आक्षेप असेल तर त्यांनी १५ दिवसाच्या आत संस्थेच्या कार्यालयात व्यवस्थापकीय समितीशी संपर्क साधावा.

ओम शिवाई एस.आर.ए.सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

सही/-
सहदेव शिवराम रसाळ
अध्यक्ष

सही/-
दत्ताराम जयराम हांदे
सेक्रेटरी

सही/-
बाळकृष्ण हरिश्चंद्र सावंत
खजिनदार

मर्कटॉर लिमिटेड

MERCATOR

नोंद. कार्यालय: [illegible], मुंबई ४०००२१.
दू.: ०२२ ६६३७३२३२ | सीआयएन: L63090MH1983PLC031418
ईमेल आयडी: secretarial@mercator.in, वेबसाईट: www.mercator.in

दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष

(रु. कोटीमध्ये)

तपशील	३१.१२.२०२० रोजी संपलेले त्रैमासिक	३१.१२.२०१९ रोजी संपलेले त्रैमासिक	३१.०३.२०२० रोजी संपलेले वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
कार्यातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	१४४.६६	१४२.६२	६३१.६९
कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्वी)	(६२.७५)	(६९.९३)	(४४४.३१)
कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात)	(६२.७५)	(६९.९३)	(४९८.८६)
कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा असामान्य बाबींपश्चात)	(६५.३३)	(६४.९२)	(५०१.४३)
कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट)	(६५.३३)	(६४.२२)	(५११.६५)
सम भाग भांडवल	३०.२५	३०.२५	३०.२५
इतर इक्विटी	(१,११२.३१)	(६०१.६०)	(१,०८८.४५)
प्रति भाग उत्पन्न (रु. १/- प्रत्येकी) (चालू आणि बंद कार्यांकरिता)			
मूळ :	(२.३१)	(२.१६)	(३०.९२)
सौम्यीकृत :	(२.३१)	(२.१६)	(३०.६३)

टिपा:

अ) वरील विवरण हे सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या दि. ३१ डिसेंबर २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि ९ महिन्यांकरिता वित्तीय निष्कर्षाच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षाचे विस्तृत प्रारूप स्टॉक एक्सचेंजची वेबसाईट www.bseindia.com व www.nseindia.com आणि कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.mercator.in येथे उपलब्ध आहेत.

ब) प्रमुख स्वतंत्र वित्तीय माहिती खाली दिल्याप्रमाणे: (रु. कोटीमध्ये)

तपशील	३१.१२.२०२० रोजी संपलेले त्रैमासिक	३१.१२.२०१९ रोजी संपलेले त्रैमासिक	३१.०३.२०२० रोजी संपलेले वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
कार्यातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	१०.१३	३३.१४	११९.१०
कर पूर्व नफा	(१८.३०)	(४०.२७)	(१,०२५.३३)
कर पश्चात निव्वळ नफा	(१८.४०)	(४१.५०)	(१,०२५.७४)

मर्कटॉर लिमिटेड करिता
सही/-
एच. के. मित्तल
संचालक

दिनांक: १२ फेब्रुवारी, २०२१
ठिकाण: मुंबई

GWELD

जीईई लिमिटेड

सीआयएन: L99999MH1960PLC011879
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. ई-१, रस्ता क्र. ७, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे-४००६०४
ईमेल: Shares@geelimited.com वेबसाईट: www.geelimited.com
दूरध्वनी: (०२५२२) २८०३५८, फॅक्स: (०२५२२) २८११९९

दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचा सारांश

₹ लाखात (प्रती भाग उत्पन्न वगळता)

अ. क्र.	तपशील	३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता	३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या चालू कालावधीकरिता वर्षाकरिता अद्ययावत आकडे	३१ डिसेंबर २०१९ रोजी संपलेल्या गत वर्षाकरिता सुसंगत ३ महिने
		(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)	(अलेखापरिक्षित)
१	कार्यातून एकूण उत्पन्न	७,९६५.४३	१६,६०४.९८	२०,१६५.५४
२	कालावधीकरिता निव्वळ नफा /(तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपूर्वी)	६०२.७१	१,०७६.१६	७१०.०९
३	कालावधीकरिता करपूर्व निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात)	६०२.७१	१,०७६.१६	७१०.०९
४	कालावधीकरिता करपश्चात निव्वळ नफा /(तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा असामान्य बाबींपश्चात)	४५१.०२	७९०.३४	५२७.०९
५	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा/(तोटा) (कर पश्चात) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) समाविष्ट)	०.०९	०.७४	०.०६
६	सम भाग भांडवल	४७२.५२	४७२.५२	४७२.५२
७	राखीव (पुनर्मूल्यांकित राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदाप्रमाणे दर्शविल्यानुसार	लागू नाही		
८	प्रति भाग उत्पन्न (दर्शनी किंमत ₹ २/- प्रत्येकी) (चालू आणि बंद कार्यांकरिता)			
	मूळ:	१.९१	३.३५	२.२३
	सौम्यीकृत:	१.९१	३.३५	२.२३

टिपा:

१. दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिककरिताचे निष्कर्ष हे कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे सूचित भारतीय लेखा मानके (आयएनडी एएस)चे अनुपालन करतात.
२. मूल्यांकन वर्ष २०१६-१७ करिता करण्यात आलेल्या ₹ ७०.९६ लाखांच्या कर मागणी विरोधात दि. १४ जानेवारी, २०१९ रोजी सीआयटी अपील-१, ठाणे यांच्याकडे कंपनीने अर्ज दाखल केला होता. [illegible]
३. [illegible]
४. आयएनडी एएस १०८ नुसार, [illegible]
५. त्रैमासिकादरम्यान गुंतवणूकदारांच्या कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत. [illegible]
६. वरील निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि त्यानंतर संचालक मंडळाद्वारे दि. १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले.
७. [illegible]
८. स्थगित कर मालमत्ता/ दायित्वे वर्षाच्या शेवटी गणना केली जातील.
९. गत वर्षांचे आकडे आवश्यक तेथे पुनर्गठित केले आहेत.

जीईई लिमिटेड करिता
सही/-
पायल अगरवाल
पूर्ण-वेळ संचालक आणि सीएफओ
डीआयएन: ०७१९८२३६

दिनांक: १२ फेब्रुवारी , २०२१
ठिकाण: ठाणे

रिषी लेजर लिमिटेड

सीआयएन: L99999MH1992PLC066412
६१२, सी. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, १०-१४ गरस स्ट्रीट, नागपाडा (पश्चिम), मुंबई - ४०० ०११.
दूरध्वनी क्र.: (०२२) २३०७४५८५ / २३०७५६७७; फॅक्स क्र.: (०२२) २३०८००२२ ईमेल: rlcl.mumbai@rishilaser.com, investors@rishilaser.com वेबसाईट: www.rishilaser.com

दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊमाहीकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांचे विवरणपत्र

(₹ लाखात)

एकत्रित						तपशील	स्वतंत्र					
संपलेले त्रैमासिक			संपलेले नऊ महिने		संपलेले वर्ष		संपलेले त्रैमासिक			संपलेले नऊ महिने		संपलेले वर्ष
३१.१२.२०२०	३०.०९.२०२०	३१.१२.२०१९	३१.१२.२०२०	३१.१२.२०१९	३१.०३.२०२०		३१.१२.२०२०	३०.०९.२०२०	३१.१२.२०१९	३१.१२.२०२०	३१.१२.२०१९	३१.०३.२०२०
अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित		अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित
२,२०४.०३	१,६३७.४६	२,०३५.०४	४,६३०.८०	७,०८२.१६	९,११७.१३	कार्यातून महसूल	२,११६.९९	१,६३३.८५	२,०२६.६७	४,६१९.६९	७,०५९.९३	९,११६.७४
(६७.७७)	(१२२.१६)	(१८९.७३)	(४२५.३५)	५१३.०४	(७४९.०९)	कर पूर्व नफा / (तोटा)	(६५.७२)	(१२०.००)	(१८७.२६)	(४१७.५१)	(५०४.४७)	(७८४.९३)
(६७.७७)	(१२२.१६)	(१८९.७३)	(४२५.३५)	५१३.०४	(२५३.९९)	अपवादात्मक बाबींपूर्वी परंतु करपूर्व नफा / (तोटा)	(६५.७२)	(१२०.००)	(१८७.२६)	(४१७.५१)	(५०४.४७)	(२८९.८३)
(६९.६७)	(१२९.११)	(७५.४८)	(४४५.१७)	७२.०६	(२२६.१२)	कालावधीकरिता नफा / (तोटा)	(६७.८७)	(१२६.१०)	(७२.९१)	(४३७.१८)	८०.९४	(२६१.६७)
(६६.८८)	(१३१.८४)	(७२.८८)	(४४१.६१)	४५.२३	(३०५.९५)	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न	(६५.०८)	(१२९.६३)	(७०.३१)	(४३३.६२)	५४.११	(३४९.५०)
९१९.२६	९१९.२६	९१९.२६	९१९.२६	९१९.२६	९१९.२६	भरणा केलेले सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १०/- प्रत्येकी)	९१९.२६	९१९.२६	९१९.२६	९१९.२६	९१९.२६	९१९.२६
					२४१.८८	पुनर्मूल्यांकित राखीव वगळता इतर इक्विटी						२५७.७५
						प्रती सम भाग उत्पन्न (दर्शनी मूल्य ₹ १०/ प्रत्येकी)						
(०.७६)	(१.४०)	(०.८२)	(४.८४)	०.७८	(२.४६)	मूळ (₹ मध्ये)	(०.७४)	(१.३८)	(०.७९)	(४.७६)	०.८८	(२.८५)
(०.७६)	(१.४०)	(०.८२)	(४.८४)	०.७८	(२.४६)	सौम्यीकृत (₹ मध्ये)	(०.७४)	(१.३८)	(०.७९)	(४.७६)	०.८८	(२.८५)

टिपा:

१. वरील विवरण हे सेबी (सूचीबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजकडे दाखल करण्यात आलेल्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे.
२. अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष लेखा समितीद्वारे पुनरावलोकित करण्यात आले आहेत आणि संचालक मंडळाद्वारे दि. १२ फेब्रुवारी, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेमध्ये मंजूर करण्यात आले आणि वैधानिक लेखापरिक्षकांनी सेबी (सूचिबद्ध) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अन्वये त्यांचे "मर्यादित पुनरावलोकन " करण्यात आले.
३. दि. ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊमाहीकरिता वित्तीय निष्कर्ष कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ आणि इतर लागू प्रमाणात मान्यताप्राप्त लेखा पद्धती आणि धोरणांअंतर्गत विहीत कंपनी (भारतीय लेखा मानके) विनियमन, २०१५ (आयएनडी एएस) नुसार तयार करण्यात आले आहेत.
४. एकत्रित वित्तीय निष्कर्षांमध्ये एक उपकंपनी म्हणजेच रिषी व्होकेशनल एज्युकेशन प्रा. लि. चे वित्तीय विवरणपत्र समाविष्ट आहे.
५. गत कालावधीचे आकडे जेथे आवश्यक तेथे पुनर्गठित / पुन:मांडणी / पुन:वर्गीकृत करण्यात आले आहे.
६. वित्तीय निष्कर्षांचे विस्तृत प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाईट आणि कंपनीची वेबसाईट www.rishilaser.com वरही उपलब्ध आहे.
७. जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) कोविड-१९च्या उद्रेकाला दि. ११ मार्च, २०२० रोजी जागतिक महामारी घोषित केले. त्यानुसार, भारत सरकारने टाळेबंदी जाहीर केली ज्यामुळे दुसऱ्या पहिल्या तिमाहिकातील व्यवसायावर परिणाम झाला. त्यानुसार पहिल्या तिमाहीमध्ये कोविड-१९ साथीच्या आजारामुळे व्यवसायावर मर्यादा आल्यामुळे ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या नऊमाहीचे निष्कर्ष ३१ डिसेंबर २०१९ रोजी संपलेल्या मागील नऊ महिन्यांशी तुलनात्मक आहेत.

रिषी लेजर लिमिटेड करिता
सही/-
हर्षद पटेल
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१६४२२८

ठिकाण: मुंबई
दिनांक: १२ फेब्रुवारी, २०२१